# प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, काटोल
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
**ई- मेल : rfrs@rediffmail.com**

जा. क्र. प्रा.फ.स.के./ सं.पी.सु.प्र./ ४९५/ २०२४ दिनांक: ०२/०२ /२०२४

## मुलाखत

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला अंतर्गत फळशास्त्र विभाग, डॉ.पं. दे. कृ. वि. अकोला येथे "संत्रा पिक सुधारणा प्रकल्प" करिता 'ड' संवर्गातील 'माळी' या पदांकरिता अस्थायी स्वरुपात निश्चित वेतनावर, अहर्ताप्राप्त उमेदवारांना मुलाखतीस बोलविण्यात येत आहे. अहर्ताप्राप्त इच्छुक उमेदवारांनी उद्यानविद्यावेत्ता, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, काटोल. येथे **दि. <u>०९/०२/२०२४</u> रोजी ठीक १०:०० वा.** मुलाखतीस हजर राहावे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | किमान अहर्ता /पात्रता | दरमहा एकत्रित वेतन प्रती कर्मचारी |
|---|---|---|---|---|
| १. | कुशल कामगार | ०३ | अ) कृषि विद्यापीठाचा १ वर्षाचा माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम उत्तीर्ण.<br>ब) माळी कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | रु.१००००/-<br>(निश्चित वेतन) |

**<u>वयोमर्यादा :</u>**

उपरोक्त पदासाठी विहित केलेल्या उमेदवारांसाठी वयोमर्यादा ही खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी मुलाखतीच्या दिनांकास ३८ वर्षे आणि मागास वर्गीय प्रवर्गातील (SC,ST,OBC,VJ,NT etc) उमेदवारांकरिता ४३ वर्षे अशी राहील.

**<u>कामाचे स्वरूप :</u>**
कुशल कामगार (माळी) पदाकरिता खालील नमूद बाबीचे कौशल्य व ज्ञान असणे आवश्यक आहे.

१. मातृबागेतील फळझाडांचे संगोपन, फळझाडांची छाटणी, पाणी, खत, कीड व रोग ई.व्यवस्थापन करणे.
२. रोपवाटीकेतील कामे जसे, विविध उगवण माध्यमांचे मिश्रणे तयार करणे,सपाट वाफे, गादी वाफे तयार करणे, बियाणे पेरणी करणे,रोपे लागवड करणे.
३. फळझाडांची अभिवृधीचे विविध प्रकार उदा. शेंडा कलम, पाचर कलम, गुटी कलम करणे, मुख्यत: डोळेकांडी काढणे व डोळे भरणे ई. बाबीमध्ये पारंगत असावे.

**<u>नियम व अटी :</u>**

१. मुलाखतीला येताना उमेदवाराने आपल्या शैक्षणिक अहर्ता, वय जातीच्या प्रमाणपत्र आणि अनुभव प्रमाण पत्र तसेच कार्यरत असल्यास ना हरकत प्रमाणपत्राच्या मुळप्रती व दोन पासपोर्ट फोटो सोबत आणाव्यात. वयाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांना नॉन क्रीमिलेयर/जातीचा दाखला जोडणे आवश्यक आहे.
२. सर्व मूळप्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती स्वयंसाक्षांकित करुन १ प्रत मुलाखतीच्या वेळी; तसेच १ प्रत रुजू होते वेळी कार्यालयास सादर करावी. प्रमाणपत्र गहाळ असल्यास उमेदवाराला प्रतीक्षा यादीत ठेवले जाईल.
३. नावामध्ये बदल असल्यास राजपत्र (गजेट जोडावे).
४. उपरोक्त पदासाठी तात्पुरत्या स्वरूपातील अभ्यासक्रम प्रमाणपत्र ग्राह्य धरल्या जाणार नाही.
५. पात्र उमेदवारांना मुलाखतीस बोलवण्यात येईल.
६. मुलाखतीस उपस्थित उमेदवाराना कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता,मुक्कामाची सोय अनुज्ञेय राहणार नाही. जर मुलाखती करिता जास्त संख्येत उमेदवार उपस्थित झाल्यास सदर मुलाखत प्रक्रिया दुसर्या दिवसी घेण्यात येईल.

७. मुलाखतीसाठी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, तसेच कोणत्याही टपाल विलंबाकरिता विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.
८. उमेदवाराला प्रकल्पातील नेमणूक पुढे चालू ठेवण्यासाठी किवा डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथे नियमित आस्थापनेसाठी दावा करता येणार नाही.
९. उमेदवाराचे काम समाधानकारक न आढळल्यास अथवा गैरवर्तणूक आढळल्यास तात्पुरत्या स्वरूपातील नेमणुकीचा कालावधी संपवण्यापूर्वी कोणतेही कारण न देता प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्याचा अधिकार कार्यालयास राहील.
१०. कार्यालयीन कामकाजाची वेळ विद्यापीठ नियमानुसार राहील. सुटीच्या दिवशी कामाच्या निकडीनुसार उपस्थित राहावे लागेल.

**-sd-**
**उद्यानविद्यावेत्ता,**
**प्रादेशिक फळ संशोधन केंद्र**
**काटोल**